सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २४९ • गुरुवार दि.२ जुलै २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## आरटीआय कायद्यातील वादग्रस्त बदलांना स्थगिती

मुंबई/प्रतिनिधी-राज्य माहिती अधिकार (आरटीआय) कायद्यात करण्यात आलेल्या वादग्रस्त बदलांना राज्य सरकारने अखेर स्थगिती दिली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या बदलांविरोधात उपोषणाचा इशारा दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत राज्य माहिती आयोगाकडे पत्र पाठवले. त्यानंतर १२ जूनच्या सुधारित अधिसूचनेतील सर्व बदलांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली.

सुधारित नियमांनुसार अर्ज शुल्क १० रुपयांवरून ३० रुपये, माहितीच्या प्रतींचे शुल्क प्रति पान ५ रुपये, तसेच प्रथम व द्वितीय अपीलासाठी शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली होती. याशिवाय एका अर्जात एकच विषय, **पान ४ वर**

# ‘त्या’खासदारांना भाजपमध्ये यायचे होते...

## मुख्यमंत्र्यांच्या गौप्यस्फोटाने राजकीय वर्तुळात खळबळ



मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील त्या सहा खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश मिळावा, अशी इच्छा व्यक्त केली होती. मात्र, भाजपने त्यांच्यासाठी पक्षाची दारे बंद ठेवली होती, असा गौप्यस्फोट भाजप नेते तथा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

शिवसेना (ठाकरे गट) सोडून शिंदे गटात गेलेल्या खासदारांच्या राजकीय हालचालींबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा खुलासा केला आहे. एका डिजिटल वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना फडणवीस म्हणाले की, ठाकरे गटातील सहा खासदारांपैकी एक-दोन जणांनी भाजपमध्ये प्रवेशाची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, ते मूळ शिवसेनेतून निवडून आलेले असल्याने त्यांनी शिवसेनेतच राहावे, ही आमची भूमिका होती. त्यांना भाजपमध्ये घेण्याची कोणतीही व्यवस्था किंवा गरज आमच्याकडे नव्हती.राज्यात सुरू असलेल्या कथित 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांवर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, संबंधित खासदारांचा शिंदे गटात झालेला प्रवेश हा मित्रपक्षाच्या स्तरावर पार पडलेला राजकीय निर्णय होता. या प्रक्रियेत शिंदे गटाला आवश्यक ते सहकार्य आम्ही केले. मात्र, अशा राजकीय घडामोडींचे सर्व तपशील सार्वजनिकपणे सांगणे योग्य ठरत नाही, असे सूचक वक्तव्यही त्यांनी केले.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करताना फडणवीस म्हणाले, राजकारणात प्रत्येक जण आपल्या भविष्यासाठी निर्णय घेत असतो. ज्या नेतृत्वाकडे सुरक्षित राजकीय भविष्य दिसत नाही, तेथून लोक पर्याय शोधतात. आम्ही अडीच वर्षे विरोधात असतानाही भाजपचा एकही आमदार किंवा खासदार फुटला नाही. कारण आमच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा आणि लोकप्रतिनिधींचा ठाम विश्वास होता. नेतृत्व **पान ४ वर**

## निमटेक येथे खरीप पेरणी करताना भीषण दुर्घटना

# वीज प्रवाहाचा धक्का लागून बैलासह शेतमजूराचा मृत्यू



नांदेड/प्रतिनिधी-उमरी तालुक्यातील निमटेक येथे पेरणीचे काम सुरू असताना वीज प्रवाहाचा धक्का लागून एका शेतमजुरासह बैलाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज (गुरुवार) दि.२ जुलै रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणा विरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून समाधानकारक पाऊस झाल्याने परिसरात खरीप पेरणीच्या कामांना वेग आला आहे. निमटेक येथील शेतकरी लक्ष्मण विठ्ठल चंदापुरे यांच्या शेतात गुरुवारी सकाळी सोयाबीन पेरणीचे काम सुरू होते. तिफणीच्या साहाय्याने बैलजोडी लावून सुमारे सहा मजूर पेरणी करत होते. यावेळी शेतातील विद्युत खांबाजवळील तणावग्रस्त वीजवाहिनीच्या संपर्कात तिफण आल्याने अचानक वीज प्रवाह उतरला. या भीषण धक्क्यात पेरणीचे काम करणारे शेतमजूर शेख अस्लम जलाल साब (वय २२) आणि एक बैल जागीच ठार झाले. अचानक झालेल्या **पान ४ वर**

# खास दुकानातूनच पुस्तक खरेदीच्या सक्तीला लगाम

## पालकांच्या लुटीवर सरकारचा चाप

मुंबई/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांना शाळेने ठरवून दिलेल्याच दुकानातून पुस्तके, वह्या व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या खासगी तसेच सीबीएसई संलग्न शाळांविरोधात राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. अशा प्रकारे पालकांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या शाळांवर कारवाई केली जाणार असून, त्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र देखरेख समिती स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानसभेत केली.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर अनेक खासगी शाळांकडून विशिष्ट दुकानातूनच पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर विधानसभेत हा मुद्दा गाजला.शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही शाळेला पालकांना विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदी करण्यास भाग पाडण्याचा अधिकार नाही. अशा तक्रारी आढळल्यास संबंधित शाळांवर शालेय शिक्षण विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येईल. काही शाळांना यापूर्वीच नोटिसा बजावण्यात आल्या असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढेही कडक पावले उचलली जातील, असे त्यांनी सांगितले.याचवेळी दहावी-बारावी बोर्ड परीक्षांतील गैरप्रकारांवरही सरकारने कठोर कारवाई सुरू असल्याचे सांगण्यात आले. सामूहिक कॉपीसह विविध गैरप्रकारांमुळे १०० कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून, बारावी परीक्षेदरम्यान राज्यभरात १५ गुन्हे दाखल झाल्याची माहिती सभागृहात देण्यात आली

# दहशतवाद्यांना आर्थिक मदत प्रकरणी एकाला अटक

## आयएसआयचे मराठवाडा कनेक्शन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी-पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित कथित हेरगिरी प्रकरणात आर्थिक मदत पुरवल्याच्या आरोपावरून राजस्थान सीआयडीच्या गुप्तचर विभागाने मराठवाड्याची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथून रफीक चाँद शेख (वय ४१) याला अटक केली आहे. ३० जून रोजी करण्यात आलेल्या या कारवाईमुळे भारतीय लष्कराची गोपनीय माहिती पाकिस्तानपर्यंत पोहोचवणाऱ्या कथित नेटवर्कच्या आर्थिक साखळीचा महत्त्वाचा धागा तपास यंत्रणांच्या हाती लागल्याचा दावा करण्यात येत आहे.

राजस्थानमध्ये जानेवारी २०२६ मध्ये अधिकृत गोपनीयता कायद्यांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान या प्रकरणाचा उलगडा झाला. यापूर्वी जैसलमेर येथील झबरा राम तसेच आसाममधील डिब्रुगड हवाई दल तळावर कार्यरत एमटीएस कर्मचारी सुमित कुमार यांना पाकिस्तानला संवेदनशील माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. या दोघांच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करताना निधीचा स्रोत छत्रपती संभाजीनगरपर्यंत पोहोचल्याचे तपासात समोर आले.तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, रफीक चाँद शेख हा गेल्या चार वर्षांपासून सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानातील एका कथित आयएसआय हँडलरच्या संपर्कात होता. त्याच्या सूचनेनुसार स्वतःच्या तसेच इतरांच्या नावाने अनेक बँक खाती उघडून त्यामार्फत निधीची देवाणघेवाण करण्यात येत होती. हा निधी भारतीय लष्कराशी संबंधित गोपनीय माहिती पुरविणाऱ्या कथित आरोपींपर्यंत पोहोचवला जात असल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे.३० जून रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये कारवाई करून रफीकला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे, निधीचा उगम कुठे आहे आणि देशभरात या नेटवर्कचे इतर धागेदोरे आहेत का, याचा राजस्थान सीआयडीकडून सखोल तपास सुरू आहे.दरम्यान, या प्रकरणामुळे देशाच्या सुरक्षेशी संबंधित संवेदनशील माहितीच्या गळतीसाठी वापरल्या जाणाऱ्या कथित आर्थिक नेटवर्कबाबत तपास यंत्रणा अधिक सतर्क झाल्या असून पुढील तपासात आणखी महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.






नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा आज शंकरराव चव्हाण सभागृहात महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. पहिल्या छायाचित्रात महापौरांसह उपमहापौर दीपकसिंह रावत, आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, नगरसचिव अजितपालसिंघ संधू दिसत आहेत. या सर्वसाधारण सभेत विरोधी बाकावरील काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या सदस्यांनी विकासाच्या प्रश्नावर घोषणाबाजी केल्याने गदारोळ निर्माण झाला.

# पन्नास किलो अंमली पदार्थ जप्त;महिलेसह दोन जणांना अटक



नांदेड/प्रतिनिधी-गुजरात राज्यातून नांदेडमध्ये विक्रीसाठी येणारे ५० किलो अंमली पदार्थ स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी मंगळवारी रात्री शहरातील साईबाबा कमानी जवळ पकडले आहे. याप्रकरणी महिलेसह दोन जणांना अटक करण्यात आली.

गुजरात राज्यातून अंमली पदार्थ एका वाहनाद्वारे विक्रीसाठी नांदेडमध्ये येणार असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक विठ्ठल घोगरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी मंगळवार दि.३० जून रोजी रात्री कौठा भागातील साईबाबा कमानीजवळ सापळा रचला. गुजरात पासिंगची संशयास्पद येणारी क्रिएटा कार क्र.जीजे-१० सीएन-३०७० थांबवून वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ५० किलो ६३० ग्रॅम वजनाची पॉपी स्ट्रॉ (बोंडे तुकडे) अंमली पदार्थ जप्त केले. पोलीसांनी प्रितसिंघ रामसिंघ पुजारी (वय २३) रा.गुरुद्वारा गेट क्र.४ व श्यामला चिंतामणी पोहरे (वय ४५) रा. चिखलवाडी, नांदेड या दोघांना अटक केली. पोलीसांनी अंमली पदार्थ, कार व एक दुचाकी असा पंधरा लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. आरोपींची पोलीसांनी चौकशी केली असता सदरील अंमली पदार्थ मध्यप्रदेशातील निमज जिल्ह्यातून गौरीशंकर राजूलाला मालवी व धनराज दनगर यांच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नांदेड जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी महेश पाटील रुजू

## पहिल्याच दिवशी घेतला खातेप्रमुखांच्या कामकाजाचा आढावा



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी आज पदभार स्वीकारला. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे महेश पाटील यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

महेश पाटील हे यापूर्वी सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. शासनाने त्यांची नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती केल्यानंतर त्यांनी आज जिल्हा परिषद कार्यालयात पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषदेतील सर्व खातेप्रमुखांची बैठक घेऊन विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. शासनाच्या लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविणे, विकासकामांना गती देणे, तसेच नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिल्या. तसेच शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे उपआयुक्त डॉ. डी. बी. खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार घुले, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड, जिल्हा कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, कार्यकारी अभियंते खराडे, संजय शिंदे व बालाजी पवार, व्यंकटराव चव्हाण, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

# पेरणीसाठी आसुसलेला मराठवाडा

महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन झाले असले, तरी त्याची वाटचाल मात्र अत्यंत असमतोल ठरत आहे. राज्याच्या एका भागात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे, तर दुसऱ्या भागात शेतकरी अजूनही आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत, धरणांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे, अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. दुसरीकडे मराठवाड्यात अद्यापही पेरणीसाठी आवश्यक असा समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे खरीप हंगामाचे नियोजन धोक्यात आले असून शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे. महाराष्ट्राच्या विकासाची आणि शेतीची ही दोन परस्परविरोधी चित्रे केवळ हवामानातील बदल दर्शवत नाहीत, तर राज्याच्या जलनियोजनातील मर्यादाही अधोरेखित करतात. एका प्रदेशात पावसाचे प्रचंड प्रमाण संकट निर्माण करत आहे, तर दुसऱ्या प्रदेशात पावसाचा अभाव संकटाचे रूप धारण करत आहे. हा विरोधाभास जितका नैसर्गिक आहे, तितकाच तो नियोजनाच्या अपुऱ्या तयारीचाही आरसा आहे. मराठवाड्यातील बहुतांश शेती आजही पावसावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून बियाणे, खते आणि इतर कृषी साहित्याची खरेदी केली आहे. अनेकांनी शेताची मशागत पूर्ण करून पावसाची प्रतीक्षा सुरू केली आहे. मात्र समाधानकारक पाऊस नसल्याने पेरणी लांबली आहे. काही भागांत झालेल्या तुरळक पावसावर केलेली पेरणी उगवण न झाल्याने वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुढे दुबार पेरणीची वेळ आल्यास त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती अधिक वेदनादायक ठरत आहे. याउलट मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे प्रशासनाची मोठी धावपळ सुरू आहे. रस्ते, रेल्वे, वाहतूक, वीजपुरवठा आणि दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. भूस्खलन, घरांची पडझड आणि शेतीचे नुकसान अशा घटनाही घडत आहेत. त्यामुळे पावसाचे संकट हे केवळ दुष्काळापुरते मर्यादित नसून अतिवृष्टीही तितकीच घातक ठरू शकते, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.हवामान बदलाचे परिणाम आता उघडपणे दिसू लागले आहेत. पूर्वी चार-पाच दिवस सलग पडणारा मध्यम स्वरूपाचा पाऊस जमिनीत मुरत असे. आता काही तासांत महिनाभराचा पाऊस कोसळतो आणि त्यानंतर अनेक दिवस पावसाचा खंड पडतो. त्यामुळे भूजल पुनर्भरणावर परिणाम होतो, जमिनीची धूप वाढते आणि शेतीचे संपूर्ण नियोजन विस्कळीत होते. भविष्यात ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे हवामान बदलाकडे केवळ पर्यावरणाचा विषय म्हणून नव्हे, तर विकास आणि अन्नसुरक्षेचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने केवळ आपत्ती व्यवस्थापनापुरते मर्यादित न राहता दीर्घकालीन जल व्यवस्थापनाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. जलसंधारण, पाणलोट विकास, शेततळी, लघु सिंचन प्रकल्प, नदी-नाल्यांचे पुनरुज्जीवन आणि पावसाच्या प्रत्येक थेंबाचा प्रभावी वापर यावर भर देणे अत्यावश्यक आहे. मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त प्रदेशासाठी स्वतंत्र आणि सातत्यपूर्ण जलधोरण राबविण्याची वेळ आता निघून गेली आहे; ती तातडीने अमलात आणण्याची गरज आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना अचूक हवामान अंदाज, पर्यायी पीक नियोजन आणि आवश्यक आर्थिक सहाय्य वेळेत उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र हा एकच आहे. त्यामुळे एका भागातील पूर आणि दुसऱ्या भागातील दुष्काळ याकडे वेगवेगळ्या समस्यांप्रमाणे पाहून चालणार नाही. पूरग्रस्तांना तातडीची मदत आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना वेळेवर आधार या दोन्ही गोष्टी शासनाने समान संवेदनशीलतेने हाताळल्या पाहिजेत. पावसाचा असमतोल हा निसर्गाचा इशारा आहे. हा इशारा वेळीच ओळखून शाश्वत जल व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि कृषी धोरणात आवश्यक बदल केले, तरच भविष्यात महाराष्ट्राला या टोकाच्या परिस्थितीपासून काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल. अन्यथा दरवर्षी अशीच परिस्थिती निर्माण होईल, एका बाजूला पुराचे पाणी आणि दुसऱ्या बाजूला पेरणीसाठी आसुसलेला मराठवाडा.

## कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा!

# ‘‘नीट’’नंतर‘‘टीईटी’’पेपर लिक हे राज्यासह देशात चाल्लय तरी काय?

रमेश लांजेवार
नागपूर

राज्यासह देशात महागाई, बेरोजगारी, कुपोषण,भुकमरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या एवढ्या मोठ्या गंभीर व जटील समस्या देशापुढे व राज्यापुढे उभ्या ठाकल्या आहे आणि जेथुन मनुष्य लहानाचा मोठा होतो अशा शिक्षण क्षेत्राचा सरकारने तमाशा करून ठेवला आहे.काही दिवसाअगोर जेथून डॉक्टर्स निर्माण होतात आणि जी मनुष्यासाठी दैवी शक्ती मानल्या जाते अशा दैवी शक्तीवर नीट पेपर फुटीने घनाघाती प्रहार केला आणि आरोग्य क्षेत्राची संपूर्ण देशभर नाचक्की झाली आणि आता दि.२८ जूनला ज्यामाध्यातून शिक्षक (टीचर, गुरूजी) निर्माण होतात अशा ‘‘गुरू’’ (शिक्षण क्षेत्रातील वटवृक्ष) या शब्दाची ‘‘टीईटी’’ पेपर फुटीने शिक्षण क्षेत्राची खुली विटंबना करून हत्याच केल्याचे दिसून येते.

शिक्षण क्षेत्राप्रमाणे प्रत्येक धर्माची देवावर आस्था असतेच असे हिंदूचे प्रतिष्ठित,जागतिक स्तरावर नामांकित हिंदूंचे श्रद्धेचे स्थान अयोध्येतील राममंदिर आहे.या मंदिरातील देणगीवर रामजन्मभूमी ट्रस्टच्या विश्वस्तांनी, तेथील कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या मंडळींनी डाका टाकला व दोन हजार कोटींपेक्षा जास्त पैसा व सोने-चांदी,आभूषणे लंपास केल्याचा अंदाज आहे. कारण २०२० ला ट्रस्ट स्थापन झाले होते तेव्हा पासून हा चोरीचा धंदा सुरू असावा असे मला वाटते.या प्रकरणाने देशाची १४० कोटी जनता स्तब्ध झाली आहे. म्हणजे ज्या आस्थेने आपण मंदिरात पैसा देतो तीथेच खुलेआम डाका पडतो ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. म्हणजे एकीकडे शिक्षण क्षेत्राचा तमाशा आणि दुसरीकडे आस्थेच्या नावावर मंदिरातील खेळ खंडोबा या घृणास्पद आणि धक्कादायक घटनांमुळे राज्यासह देशातील प्रत्येक व्यक्तींची मने दुखावली आहेत.हा सर्व प्रकार एकाच महिन्यात म्हणजे जून महिन्यात दिसून आला.सरकारने जनूकाय शिक्षणाचा व आस्थेचा तमाशा मांडला की काय असे चित्र देशासह महाराष्ट्रात दिसून येते.नीट पेपर लिक प्रकरणांमध्ये महाराष्ट्रातूनच सुरूवात झाली आणि नीट पेपर लिक प्रकरणातील अनेक दिग्गज महाराष्ट्रातुन पकडल्या गेले यात पुण्यातील जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरे, प्रा.पी.व्ही.कुलकर्णी, मनीषा वाघमारे, आणि ‘‘बोगस डॉक्टर घडवणाऱ्या फॅक्टरीचा’’ अर्थात आयसीसीचा संचालक शिवराज मोटेगावकर यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासून महाराष्ट्राला देशात बदनाम करण्याचे काम केले आणि आता दि.२८ जूनला २०२६ ला होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षेची (महाटीईटी) प्रश्नपत्रिका फुटल्याचा प्रकार समोर आला आहे. यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात बोगस शिक्षण प्रणालीला चालना देणारे मोठ-मोठे मासे आपल्या राज्यात घर करून आहे व शिक्षण प्रणालीला कलंकित करीत




आहे. ही बाब नीट पेपर लिक,नंतर टीईटी पेपर लिक प्रकरणावरून सिध्द होते.जनुकाय देशासह राज्यात शिक्षणाचा बाजार मांडला की काय असे चित्र दिसत आहे. नीट पेपर लिक प्रकरणात शिक्षण विभागाने २५ लाख विद्यार्थ्यांच्या भावनेशी खेळखंडोबा केला काही विद्यार्थ्यांना पेपर लिक प्रकार पेलले नाही व मनस्ताप अनावर झाला अशा परिस्थिती देशातील २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या सुध्दा केल्या अशी भयावह घटना नीट पेपर लिक प्रकरण घडली. नीट पेपर लिक प्रकरणाला काही दिवसच होत नाही तर शिक्षणक्षेत्राला काळीमा फासणारी घटना आणि कलंकित करणारी घटना महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) लीक प्रकरणात दिसून आली यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला. ‘‘टीईटी’’ प्रश्नपत्रिका दीड कोटी रुपयांना विकण्यासाठी दिल्लीहून आलेल्या तीन जणांना पोलीस पथकाने मुंबई- नाशिक महामार्गावरील ओवळी डोंगराळी गाव परिसरात सापळा रचून आरोपींना अटक केली यात धीरज बलराज सिंग हरयाणा, राजीव शाव बिहार, आणि आकाश कुमार सरोज कुमार अशी अटकेची तीन आरोपींची नावे आहेत. हे आरोपी जरी हरयाणा व बिहारचे असले तरी टीईटी पेपर लिकचे मुख्य सुत्रधार महाराष्ट्रातीलच राहु शकते. कारण नीट पेपर लिक प्रकरणात महाराष्ट्रातील दिग्गज अग्रेसर होते. त्याचप्रमाणे टीईटी पेपर लिकमध्ये महाराष्ट्रातील अनेक दिग्गज व राजकीय पुढारी सामिल राहू शकतात यालाही नाकारता येत नाही. नीट पेपर लिक प्रकरण मोठ्या प्रमाणात गाजले यात २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या एवढे होऊनही नीट पेपर लिकची जबाबदारी सरकार स्विकारण्यास तयार नाही आणि आता महाराष्ट्रात झालेल्या टीईटीपेपर लिक प्रकरणात सुध्दा सरकार जबाबदारी स्वीकारणार नाही.फक्त एसआयटी चौकशीची भाषा होईल आणि होत आहे. शेवटी खोदा पहाड निकला चुहा अशीच परिस्थिती होईल असे चित्र दिसत आहे. महाराष्ट्रात नुकत्याच (२८ जून २०२६) आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी (महाटीईटी) एकूण ६ लाख १२८ उमेदवार होते.सोबतच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवेत असलेल्या शिक्षकांनाही टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक झाल्यामुळे यंदा परीक्षार्थींच्या संख्येत विक्रमी वाढ झाली होती.परंतु टीईटी पेपर फुटल्याने संपूर्ण महाराष्ट्रात गोंधळ झाला आणि परीक्षा पुढे ढकलण्याचे संकेत आले.अशाप्रकारे सरकारच्या चुकांमुळे ६ लाख १२८ उमेदवारांना सरकारने चिंतेत टाकले आहे.अशा घटना पुन्हा-पुन्हा होणार नाही याची दक्षता केंद्र व राज्य सरकारने घ्यावी व पेपर लिक प्रकरणात जे कोणी सहभागी असेल त्या सर्वांवर कठोर कारवाई करण्यात यावी.जय हिंद.

# आ.राजेश पवार व पुनम पवार यांच्या उमेदवारीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत चुरस

नायगाव/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीला वेग आला असून, आमदार राजेशजी पवार व भाजपच्या जिल्हा सरचिटणीस सौ. पूनम राजेश पवार यांनी मंगळवारी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यांच्या उमेदवारीमुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत चुरस वाढली असून, सत्ताधारी आणि विरोधी गटांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यावेळी भाजपचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संजयजी कोडगे, चैतन्यबापू देशमुख, राजेशजी कुंटूरकर, किशोर देशमुख, मारोतराव कवळे गुरुजी, डॉ. विक्रम देशमुख, गंगाधर राठोड साहेब, प्रा. मनोहर पवार सर, विधानसभा प्रमुख बाबासाहेब पाटील हंबर्डे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष बापूसाहेब पाटील कौडगावकर, प्रा. डॉ. मनोहर तोटरे सर, भाजप तालुकाध्यक्ष श्रीहरी पाटील देशमुख, युवा नेतृत्व विजय पाटील डांगे, डॉ. अमोल ढगे (भाजप तालुकाध्यक्ष, उमरी), ज्ञानेश्वर पाटील सावंत, सरपंच सोपान पाटील कदम, सरपंच मारोती पाटील कदम, भगवान डांगे, रामेश्वर पाटील जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर उपस्थितांनी आ. राजेश पवार व सौ. पूनम




पवार यांना शुभेच्छा देत विजयाचा विश्वास व्यक्त केला. दरम्यान, सत्ताधारी आणि विरोधी गटांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास वेग आला असून, दोन्ही बाजूंनी जोरदार शक्तिप्रदर्शन आणि मतदारांच्या भेटीगाठी सुरू झाल्या आहेत. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक अधिक प्रतिष्ठेची बनली असून, आगामी काळात राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सहकार क्षेत्रासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आता या निवडणुकीकडे लागले आहे.

# ‘लाडकी बहीण’नंतर आता ‘लाडके मायबाप’ योजनेची मागणी;ज्येष्ठांना दरमहा ५ हजार मानधन द्या!

नांदेड/प्रतिनिधी-राज्यात ’लाडकी बहीण’ आणि ’लाडका भाऊ’ यांसारख्या योजनांनंतर आता ६० वर्षांवरील पात्र ज्येष्ठ नागरिकांसाठी ’लाडके मायबाप योजना’ सुरू करून दरमहा ५ हजार रुपयांचे मानधन द्यावे, अशी ठाम मागणी फेस्कॉमच्या उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी केली आहे. वृद्धत्व हा गुन्हा नाही आणि बाबांचा सन्मान म्हणजेच महाराष्ट्राचा सन्मान आहे, असे सांगत त्यांनी शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानासाठी ठोस निर्णय घ्यावा, असे आवाहन केले.

ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत डॉ. वैद्य यांनी महामहीम राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांना स्मरणपत्र पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. या स्मरणपत्रात ज्येष्ठ नागरिकांच्या १३ प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले असून त्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.दरम्यान, मुंबई येथे सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात नांदेड दक्षिणचे शिवसेना आ.आनंदराव बोंढारकर हे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांवर लक्षवेधी सूचना मांडणार आहेत. या माध्यमातून शासनाकडे १३ प्रलंबित मागण्यांचा पाठपुरावा करण्यात येणार असून, अधिवेशनात या विषयावर सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे.यापूर्वी १० जून २०२६ रोजी नांदेड येथे सुमारे १० हजार ज्येष्ठ नागरिकांनी वृद्धत्व हा गुन्हा नाही हा संदेश देत ऐतिहासिक मूक फेरी काढली होती. या आंदोलनाची शासनाने दखल घेत १८ जून २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिव कार्यालयातून संबंधित विभागांना नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. या आदेशानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.२२ जूनपासून सुरू झालेले राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २५ जुलैपर्यंत चालणार असून, या कालावधीत ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनासह विविध प्रलंबित मागण्यांवर शासनाने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा डॉ. हंसराज वैद्य आणि ज्येष्ठ नागरिक संघटनांनी व्यक्त केली आहे.

# स्थानिक निवडणुकांपूर्वी सारखणीतील मेळाव्यात शिवसेनेचे शक्तीप्रदर्शन



किनवट/प्रतिनिधी-किनवट विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.प्रदीप नाईकांच्या स्वर्गवासाच्या पश्चात माजी जिल्हा परिषद सदस्य विशाल जाधव यांनी शिंदेंच्या शिवसेनेतील पक्षांतरानंतर शक्तीप्रदर्शनाचा विविधांगी पहिला कार्यक्रम संपन्न झाला. हरित क्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईकांच्या जयंतीचे पवित्र औचित्य साधून १ जुलै रोजी सारखणी येथे महाआरोग्य सर्वरोग निदान शिबिर व कार्यकर्ता मेळाव्याचे उद्घाटन आणि रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वातावरण निर्मितीच्या अनुषंगाने आणि सद्या महाराष्ट्रात चालवलेल्या ऑपरेशन टायगरच्या दृष्टीने या कार्यक्रमाकडे राजकीय दृष्ट्या अनन्य साधारण महत्वाचा म्हणून पाहिल्या गेले आणि वातावरण निर्मितीसाठी पुरकही ठरेल असा विश्वास व्यक्तविलाय. किनवट आणि माहूर तालुक्याचा मध्यबिंदू माणल्या गेलेल्या सारखणीतील कार्यकर्ता मेळाव्यात खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी उपस्थितांना प्रबोधन करताना आवर्जून लाडकी बहिण योजनेवर फोकस केले होते. एकनाथराव शिंदे मुख्यमंत्री असताना योजना कार्यान्वित केल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी स्व.वसंतराव नाईकांनी अहोरात्र मेहनत घेतली त्याच आदर्शावर महायुती सरकार काम करतेय असे ते म्हणाले. निष्ठावंत शिवसैनिक तुमच्या पक्षात अजिबात थांबायला तयार नाही. सत्तेची संधी गमावून बसलात. आडीच वर्षाच्या काळात आडीच दिवस मंत्रालयात जाणारे मुख्यमंत्री म्हणून तुमच्यावर मोहोर लागलीय, अगदी त्या उलट मुख्यमंत्री एकनाथराव शिंदेंचा काळ ठरला. सर्व स्तरातील लोकविकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. ऊठसूट शिव्या देण्यातच धन्यता मानली. पक्षाचे नाव शिवसेना नव्हे तर शिव्यासेना ठेवा. आत्मपरीक्षण करण्याची तुमच्यावर वेळ आलीय असा चमटाही उबाठाला घेतलाय. मंचावर बंजारा समाजाच्या काशी येथील महंत जितेंद्र महाराज, संपर्क प्रमुख संदेश पाटील, खा.नागेश पाटील आष्टीकर, आ.बाबुराव कोहळीकर, जिल्हा प्रमुख विवेक देशमुख, किनवट तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे, माहूर तालुका प्रमुख सुदर्शन नाईक, मारोती सुंकलवाड, शहर प्रमुख सुरज सातुरवार, महिला आघाडी तालुका प्रमुख गंगुबाई परेकार, युवासेना तालुका प्रमुख अजय कदम, सुनील गरड, मनोज तिरमनवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

## पावसाचा शिडकावा

नांदेड/प्रतिनिधी-मृग नक्षत्र उलटून महिना लोटला आहे. तरी दमदार पावसाचा अजून पत्ता नाही. खरीप हंगामातील पेरण्याला मृग नक्षत्राच सुरुवात होते. परंतु पेरणीसाठी समाधानकारक पाऊस नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. अशातच गेल्या दोन दिवसांपासून पावसाला सुरुवात झाली असली तरी पेरणीला पोषक असा पाऊस झाला नाही. आज दुपारी ४ च्या सुमारास पावसाच्या हलक्या सरी शहरात बरसल्या. यामुळे नेहमी प्रचंड उकाडा जाणवरा मात्र आज जाणवत नव्हता. त्यामुळे शहरी नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

# राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर रात्रीचा प्रवास प्रवाशांसाठी ठरतोय धोकादायक

## वारंगा-हदगाव उड्डाण पुलावरील स्ट्रीट लाईट महिन्यापासून बंद



हदगाव/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील वारंगा ते हदगाव दरम्यान तसेच हदगाव शहरालगत कवठा परिसरातील उड्डाणपुलांवरील स्ट्रीट लाईट्स महिन्यांपासून बंद असल्याने रात्रीच्या वेळी वाहनचालक व प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

अंधारामुळे या मार्गावर कधीही मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त होत असून, नागरिकांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) नांदेड प्रकल्प अंमलबजावणी युनिटकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर काही दिवस स्ट्रीट लाईट्स सुरू होत्या. मात्र त्यानंतर त्या बंद पडल्या असून आजतागायत दुरुस्त करण्यात आलेल्या नाहीत. परिणामी, रात्री उड्डाणपुलांवर संपूर्ण अंधाराचे साम्राज्य पसरते. या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात जड वाहने, प्रवासी वाहने तसेच दुचाकींची वाहतूक होत असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक जागरूक नागरिकांनी एनएचएआयच्या नांदेड येथील प्रकल्प संचालकांना निवेदन सादर केले आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारलेल्या महामार्गावर मूलभूत सुरक्षाव्यवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच तक्रार नेमकी कोणाकडे करावी, याची माहितीही नागरिकांना उपलब्ध नसल्याने एनएचएआयची तक्रार निवारण यंत्रणा स्थानिक स्तरावर निष्क्रिय असल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांनी प्रशासनाला थेट सवाल केला आहे की, अंधारामुळे एखादी गंभीर दुर्घटना घडून जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? अशा घटनेची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी एनएचएआय व पीआययू, नांदेड यांच्यावरच राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.निवेदनात वारंगा ते महागाव मार्गावरील तसेच हदगाव शहराजवळील कौठा परिसरातील उड्डाणपुलांवरील सर्व बंद स्ट्रीट लाईट्स तातडीने सुरू कराव्यात, नियमित देखभाल व तपासणीसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, सुरक्षेतील हलगर्जीपणासाठी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर शिस्तभंगाची कारवाई करावी आणि या संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती सार्वजनिक करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.दरम्यान, मोठी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून महामार्गावरील प्रकाशव्यवस्था पूर्ववत करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि प्रवाशांकडून केली जात आहे.

## हानेगाव येथे मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मौजे हानेगाव येथे सुरु असलेल्या मटका अड्डयावर बुधवारी सायंकाळी मरखेल पोलीसांनी धाड टाकुन दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

हानेगाव येथे सर्रासपणे मटका सुरु आहे. नवीन पोलीस अधीक्षक रुजू झाल्यानंतरही या भागातला मटका बंद झाला नाही. बुधवारी सायंकाळी मरखेल पोलीसांच्या एका पथकाने मटका अड्डयावर धाड टाकली. लोकांकडून पैसे घेवून मटका खेळविणाऱ्या तिरुपती प्रभू भुरे (वय ३५), सल्लाउद्यीन रफीउद्यीन कोटग्याळे दोघे रा.हानेगाव यांना अटक केली. त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख रक्कम जप्त केली आहे.

## इतवारा पोलीसांनी साडेसहा हजार नशेच्या गोळ्यांसह गांजा केला जप्त

नांदेड/प्रतिनिधी-इतवारा पोलीसांनी धडक कारवाई करुन शासनाने प्रतिबंधीत केलेल्या साडेसहा हजार नशेच्या गोळ्यांचा साठा, गांजा व एक तलवार जप्त केली आहे. याप्रकरणी एका तरुणास अटक करण्यात आली.

इतवारा भागात नशेच्या गोळ्या व गांजाची विक्री होत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.निलभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक श्री.खन्नाळ, पोलीस निरिक्षक संजय शिंदे, फौजदार प्रविण आगलावे व पोलीस कर्मचाऱ्यांनी सापळा रचुन विनोद रामचंद्र जोंधळे यास अटक केली. त्याच्याकडून शासनाने प्रतिबंधीत केलेल्या प्रिगालॅब-३०० या साडेसहा हजार गोळ्या, ७०० ग्रॅम गांजा व एक तलवार जप्त केली. अंमली पदार्थ पुरवठा करणाऱ्या व विक्री करणाऱ्या साखळीचा पोलीस शोध घेत आहेत. याप्रकरणी विनोद रामचंद्र जोंधळे याच्या विरुध्द इतवारा पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## आठ हजाराची देशी दारु पोलीसांनी पकडली

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या देशी दारु विक्रीसाठी दुचाकीवरुन घेवून जात असतांना बुधवारी रात्री विमानतळ पोलीसांनी माळटेकडी शिवारात सदरील दुचाकी पकडून आठ हजार रुपयांची देशी दारु जप्त करण्यात आली. तुषार प्रकाश बगाटे (वय २६) रा.सांगवी (बु.) हा दुचाकीवर देशी दारु जादा दराने विक्रीसाठी घेवून जात असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. बुधवारी रात्री मालटेकडी शिवारात तुषार बगाटे यास दुचाकीसह पोलीसांनी पकडले. त्याच्या जवळ ८ हजार रुपये किंमतीची देशी दारु व दुचाकी असा ६० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपी विरुध्द विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुदखेडमध्ये बिअरबार ॲण्ड रेस्टारंट फोडले

नांदेड/प्रतिनिधी-मुदखेड शहरातील चंद्राबार ॲण्ड रेस्टारंटचे शटरचे कुलूप तोडून चोरट्यांनी ९१ हजार रुपये चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

